**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१८-१९/शिष्यवृत्ती/६१० दिनांक : २१.०२.२०१९

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/
टप्पा अनुदानित/कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची डीबीटी पोर्टलवरुन प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१८/ डीबीटी/२४८४ दि. २०.०२.२०१९.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी **महाडीबीटी पोर्टल** वर शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येतात. त्यानुसार कार्यालयीन संकेतस्थळावर तसेच ईमेलद्वारे पाठविण्यात आलेल्या विविध परिपत्रकान्वये सर्व महाविद्यालय/संस्था/विद्यापीठांना वारंवार सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच याबाबत डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

**१. विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. २८.०२.२०१९ असून, यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नाही. तरी सर्व विद्यार्थ्यांना महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज भरुन तात्काळ पुढे फॉरवर्ड करण्याबाबत कळविण्यात यावे. महाविद्यालयामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहील्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.**

**२. विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती योजनांचा लाभ मिळण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांना मान्यता दिल्यानंतर जर विद्यार्थ्यांना अथवा महाविद्यालयाला लाभाची रक्कम दिसत नसेल. तर अशा सर्व महाविद्यालयांनी तात्काळ शैक्षणिक वर्ष अनुक्रमे सन २०१४-१५, २०१५-१६, २०१६-१७, २०१७-१८ या वर्षांची सदर अभ्यासक्रमांची सर्व शैक्षणिक फी महाडीबीटी पोर्टलवर भरुन सोबत योग्य ती सहपत्रे जोडून फी मान्यतेसाठी ऑनलाईन पाठविण्यात यावेत. कोणत्याही पात्र विद्यार्थ्यांची**

Scanned by CamScanner

लाभाची फी मंजूर न झाल्यामुळे आर्थिक सवलत किंवा शिष्यवृत्ती न मिळाल्यास त्याकरिता प्राचार्यांची सर्वस्वी जबाबदारी राहील. महाविद्यालयांना वारंवार सूचना देऊनही, तसेच वारंवार दूरध्वनीद्वारे कळवून देखील अनेक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज संस्था स्तरावर प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच हार्ड कॉपी महाविद्यालयात जमा न केल्यामुळे काही महाविद्यालयांनी ऑनलाईन तपासणी केलेली नाही असेदेखील निदर्शनास आले आहे. तरी सर्व महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावरील प्रलंबित अर्ज तात्काळ ऑनलाईन तपासणी करुन निकाली काढावेत. तसेच महाविद्यालय लॉगीनवर एकही ऑनलाईन अर्ज प्रलंबित राहणार नाही याची खबरदारी घ्यावी.

३. उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जाची स्थिती तपासावी. डीडीओद्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. तसेच विद्यार्थ्यांना एसएमएस देखील प्राप्त होतो. शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज करतेवेळी विनाआधार या पर्यायाचा वापर करुन, महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचे अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन आधार क्रमांक अपडेट करुन घ्यावा. शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना त्यांचे आधार लिंक असलेल्या बँक खात्यामध्ये देण्यात येणार आहे. सदरची बाब संबंधित विद्यार्थ्यांच्या तातडीने निदर्शनास आणावे.

विद्यापीठ / संस्था / महाविद्यालय यांच्यामधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव आणि महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

(डॉ. विजय नारखेडे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner